महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

सत्यमेव जयते

जा. क्र. मअॅप/ अॅक्यू. संस्था / OPD Compulsory / २३३ /२०२६ दिनांक : ०२/०४/२०२६

# परिपत्रक

विषय : सर्व मान्यताप्राप्त संस्थांमध्ये बाह्यरुग्ण विभाग अनिवार्यपणे सुरू ठेवण्याबाबत.

संदर्भ :१. अॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाचे पात्रता निकष (MSR)

२. परिषदेचे परवानगीपत्र (LOP)

महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषदेमार्फत, महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार अॅक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. शासनाच्या सूचनेनुसार परिषदेच्या मान्यता व संलग्नता प्राप्त सर्व संस्थांमध्ये अॅक्यूपंक्चर संबंधित बाह्यरुग्ण विभाग (OPD) कार्यरत असणे आवश्यक आहे.

बाह्यरुग्ण विभागासाठीची आवश्यक माणके MUHS व शासनाने मान्य केलेल्या MSR मध्ये नमूद केलेली आहेत. तथापि, काही संस्थांमध्ये अद्यापही बाह्यरुग्ण विभाग नियमित व सुस्थितीत सुरू नसल्याचे निदर्शनास आले आहे, ही बाब गंभीर आहे.

यास्तव, सर्व संबंधित संस्थांना सूचित करण्यात येते की त्यांनी आपल्या संस्थेमध्ये बाह्यरुग्ण विभाग तातडीने सुरू करून तो सुव्यवस्थित व नियमितपणे कार्यान्वित करावा. रेडिओलॉजी किंवा इतर लॅब लगेच सुरू करणे शक्य नसल्यास अन्य सुविधा पुरविणाऱ्या पुरवठादाराबरोबर समन्वय/करार करून विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल करण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

ज्यामुळे रुग्णसेवा सुधारेल तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक प्रात्यक्षिक (Practical) प्रशिक्षणाचा लाभ मिळेल.सर्व संस्थांनी या संबंधीचा अहवाल पुढील ८ दिवसात परिषदेस सादर करावा.

(नारायण नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषद, मुंबई